दिनांक ०८/०७/२०२२

# प्रेसनोट

म.रा.वि.वि कंपनी मर्या. शाखा कार्यालय सांगोला शहर येथील लोकसेवक यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी झाले सापळा कारवाईबाबत

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र |
| गुन्हा नोंद क्रमांक | सांगोला पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७, ७ (अ) प्रमाणे |
| आरोपीचे नांव व कार्यालय | राहुल बिरबल गंगणे, वय ३० वर्षे, व्यवसाय नोकरी पद वायरमन (टेक्नीसियन) म.रा.वि.वि कंपनी मर्या. शाखा कार्यालय सांगोला |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १००००/- रु |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १००००/- रु |
| थोडक्यात माहिती | पडताळणी दि ०८/०७/२०२२<br>सापळा दि ०८/०७/२०२२<br>यातील तक्रारदार यांनी त्यांचे घरात काही दिवसांपुर्वी लाईट गेल्याने त्यांचे मिटरची पाहणी करुन त्याचे वायर काढुन चेक केले व सदरचे वायर परत मिटरला लावले. परंतु सदर वायर लावते वेळी तक्रारदार यांनी चुकीची वायर जोडणी केली. दि.०२/०७/२०२२ रोजी यातील वायरमन गंगणे यांनी तक्रारदार यांचे घराचे मिटर चेक करुन मिटरचा फोटो काढला असता त्यांना विज मिटर मध्ये छेडछाड केली असल्याची बाब निदर्शनास आली त्यावरुन तक्रारदार यांना ५०,०००/- रुपये दंड लागणार असे म्हणुन साहेबांना बोलुन दंड न करण्याबाबत सांगणेकरीता व दंड न करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रुपये साहेबांकरीता द्यावे लागतील असे म्हणुन लाच मागणी केली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान यातील आलोसे गंगणे यांनी तक्रारदार यांचेकडे विज मिटर मध्ये छेडछाड केल्याबाबत रु ५००००/- दंड लागेल असे सांगुन दंड न करण्याकरीता १००००/- रु लाचेची मागणी केली व सापळा कारवाईदरम्यान सदर लाच रक्कम स्वतः स्विकारली असता यातील आरोपी लोकसेवकास रंगेहाथ पकडण्यात आले आहे. यातील आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले असुन सविस्तर गुन्हा दाखल करण्यात येत आहे. |
| मार्गदर्शन अधिकारी | श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाप्रवि, पुणे<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे |
| पर्यवेक्षण अधिकारी | श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, सोलापूर |
| सापळा पथक | श्री.चंद्रकांत कोळी, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर<br>श्री. उमाकांत महाडीक, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर<br>पोलीस अंमलदार- पकाले, सण्णके, पवार सर्व ने. अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **टोल फ्री क्रमांक- १०६४ वर किंवा पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर येथे** संपर्क साधावा.

**संकेतस्थळ** - www.acbmaharashtra.gov.in

ई मेल - www.acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार – acbmaharashtra.net

दुरध्वनी क्रमांक- ०२१७-२३१२६६८

व्हॉटस ॲप क्रमांक – ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर. सोलापूर.

(चंद्रकांत कोळी)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो. सोलापूर.